फौ.कि.अ.क्र. ११५/२०२२

मनिषा-वि-इंद्रजित

## <u>नि. क्र. ४४ खालील आदेश</u>

१) प्रस्तूतचा अर्ज अर्जदार हिने गैरअर्जदाराच्या वेतनातून दरमहा थकित खावटी वसूल करुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२) सदरील अर्जास गैरअर्जदार यांनी आक्षेप नोंदविला आहे की, अर्जदाराने प्रस्तूत प्रकरणा व्यतिरिक्त थकित खावटी वसूली करिता या न्यायालयात फौ.अ.क्र. ११३/२०२० दाखल केलेला आहे व त्यामधील **नि.क्र. १४** वरील आदेशा प्रमाणे सदर गैरअर्जदाराच्या वेतनातून दरमहा ६०००/– रुपये कपात होत आहे. त्यामुळे अर्जदाराच्या मागणी प्रमाणे सदर गैरअर्जदाराच्या वेतनातून आणखी रक्कम कपात करु नये असे त्यांनी नमूद केले आहे. तसेच सदर गैरअर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे प्रस्तूत अर्जाच्या समर्थनार्थ अर्जदाराने शपथपत्र दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती गैरअर्जदार यांनी केली आहे.

३) प्रस्तूतचा अर्ज, त्यावरील लेखी खुलासा व मुळ अभिलेखाचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूतचे मुळ प्रकरण अर्जदार हिने फौ.कि.अ.क्र. ८३/२०११ मधील आदेशाच्या अंमलबजावणी करीता दाखल केलेले आहे. सदरील आदेशानुसार अर्जदारांस दि. २०/०६/२०११ पासून दरमहा १५००/– रुपये घरभाडे व दरमहा १०००/– रुपये खावटी खर्च तसेच सदर अर्जाचा खर्च म्हणून १०००/– रुपये याप्रमाणे खावटी मंजूर झालेली आहे. तसेच अर्जदाराचे म्हणण्याप्रमाणे आज रोजी गैरअर्जदाराकडे तीची दि. २०/०६/२०११ ते दि. २०/०६/२०२० पावेतोची एकूण रक्कम २,७१,०००/– थकित खावटी वसूल करणे बाकी आहे. तसेच त्याबाबतचे प्रथमदर्शी दस्तऐवज अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेले आहे.

४) तसेच गैरअर्जदाराच्या आक्षेपाप्रमाणे त्याच्या दरमहा वेतनातून यापूर्वीच्या फौ.कि.अ.क्र. ११३/२०२० मधील आदेशा प्रमाणे दरमहा ६०००/– रुपये कपात होत आहे. त्यासाठी प्रस्तूतचे मुळ प्रकरण व सदर फौ.कि.अ.क्र. ११३/२०२० या दोन्ही प्रकरणांचे अवलोकन केले असता, अर्जदाराने यापूर्वी या न्यायालयात फौ.प्र.सं. कलम १२५ अन्वये फौ.कि.अ.क्र. ७८/२०११ व कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये फौ.कि.अ.क्र. ८३/२०११ याप्रमाणे दोन वेग–वेगळे प्रकरणे दाखल केले होते. तसेच सदरील दोन्ही प्रकरण हे दि. १०/०२/२०१४ रोजीच्या

आदेशानुसार अंशतः मंजूर झालेले आहे. तसेच सदरील दोन्ही प्रकरणातील आदेशा विरुध्द आज रोजी मा. वरिष्ठ न्यायालयात अपील प्रलंबित असल्याबाबत अभिलेखावर काहीही नाही. त्यामुळे सदरील दोन्ही प्रकरणातील खावटी वसूलीबाबतचे आदेश आज रोजी कायम असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते.

५) तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता, अर्जदारास यापूर्वी फौ.कि.अ.क्र. ७८/२०११ मध्ये मंजूर झालेल्या थकित खावटी वसूली करिता तिने फौ.कि.अ.क्र. ११३/२०२० हे प्रकरण दाखल केलेले असल्याचे दिसून येते. त्याचं बरोबर प्रस्तूतचे प्रकरण हे अर्जदाराने तिला यापूर्वी मंजूर झालेल्या फौ.कि.अ.क्र. ८३/२०११ मधील थकित खावटी वसूलीकरिता दाखल केलेले असल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच प्रस्तूत प्रकरण व फौ.कि.अ.क्र. ११३/२०२० हे दोन्ही प्रकरणे उपरोक्त नमूद वेगवेगळया प्रकरणातील आदेशाच्या अंमलबजावणी करिता दाखल केलेले असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर गैरअर्जदाराच्या आक्षेपा प्रमाणे गैरअर्जदाराच्या दरमहा वेतनातून ६०००/– रुपये दरमहा वेतन कपात होत असले, तरी सदरील वेतन कपात ही प्रस्तूत अर्जातील थकित खावटी वसूलीकरिता नसून, सदर वेतन कपात ही फौ.कि.अ.क्र. ११३/२०२० या प्रकरणातील थकित खावटी वसूली करिता असल्याचे स्पष्ट होते.

६) तसेच प्रस्तूत प्रकरणाचे अवलोकन केले असता, अर्जदाराने प्रस्तूतचे प्रकरण हे दि. २०/०६/२०११ ते दि. २०/०६/२०२० पावेतोच्या एकूण २,७१,०००/– थकित खावटी वसूली करिता दाखल केलेले आहे. तसेच प्रस्तूत प्रकरणात गैरअर्जदाराने **नि.क्र. २३** अन्वये त्याने यापूर्वी अर्जदारास जमा केलेल्या थकित खावटीबाबत काही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेले आहे. सदरील सर्व दस्तऐवजांचे अवलोकन केले असता, त्यानुसार प्रस्तूत प्रकरणात अर्जदाराने यापूर्वी कोणतीही रक्कम जमा केलेली असल्याबाबत त्यावरुन काहीही स्पष्ट होत नाही.

७) एकंदरीत संपर्ण अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तूत प्रकरणात गैरअर्जदाराने आज पावेतो एकही रुपया थकित खावटी रक्कम जमा केलेली नसल्याचे स्पष्ट होते. तसेच सदर थकित खावटी वसूली कामी यापूर्वी गैरअर्जदारास अनेक वेळेस वसूली वारंट काढून देखील, त्याचा कुठलाही बजावणी अहवाल अभिलेखावर प्राप्त झालेला नाही. त्यामुळे अर्जदार ही सदर प्रकरणातील थकित खावटी वसूली कामी हतबल झालेली असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते.

८) तसेच अभिलेखावरील **नि.क्र. ४२** वरील गैरअर्जदाराच्या माहे जुलै–२०२२ या महिन्याच्या वेतन प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता, सदर गैरअर्जदारास दरमहा एकूण ५८,९१६/– रुपये वेतन असल्याचे स्पष्ट होते. तसेच सदर वेतनातून सर्व कपाती वजा जाता त्यास दरमहा २८,१९२/– रुपये दरमहा निव्वळ वेतन असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदर गैरअर्जदारा हा अर्जदाराची प्रस्तूत प्रकरणाची थकित खावटी भरण्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याचे स्पष्ट होते. एकंदरीत सदर गैरअर्जदाराच्या दरमहा वेतनातून फौ.कि.अ.क्र. ११३/२०२० मधील थकित खावटी वसूली करिता दरमहा ६०००/–रुपये कपात होत असले तरी, त्याचे निव्वळ वेतन व प्रस्तूत प्रकरणातील थकित खावटी विचारात घेता, सदर गैरअर्जदाराच्या दरमहा वेतनातून आणखी काही रक्कम दरमहा कपात करणे आवश्यक असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते. त्यामुळे खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेः–

## आदेश

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी गैरअर्जदार पोलीस कॉस्टेबल नामे–इंद्रजित बळीराम राठोड ब. क्र. १६७ पोलीस स्टेशन खोलापुरी गेट,अमरावती शहर यांच्याकडे थकीत असलेल्या एकूण २,७१,०००/– खावटी रक्कम वसूली पर्यंत, त्यांच्या दरमहा वेतनातून ८,०००/– रुपये याप्रमाणे रक्कम कपात करुन, सदर कपात केलेली रक्कम या न्यायालयातील फौ.कि.अ.क्र. ११५/२०२० या प्रकणात जमा करावी व त्याचा पूर्तता अहवाल पुढील तारखेपर्यंत या न्यायालयात दाखल करावा.

३. सदरील आदेशाच्या पुर्ततेकामी सबंधीत विभागास पत्र व्यवहार करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by BHARAT SANTARAM JAGDALE
Date: 2023.07.25 17:16:36 +0530

दि. २५/०७/२०२३

(भरत सं. जगदाळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. १, दिग्रस